# PAPER-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________________

   (Name) ____________________________

2. (Signature) ____________________________

   (Name) ____________________________

| S | 3 | 8 | 1 | 3 |
|---|---|---|---|---|

OMR Sheet No. : .............................................

(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |

(In figures as per admission card)

Roll No.____________________________________

(In words)

Time : **2 $^1/_2$** hours] [Maximum Marks : **150**

Number of Pages in this Booklet : **12**

Number of Questions in this Booklet : **75**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of seventy five multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal / polythene bag on the booklet. Do not accept a booklet without sticker-seal / without polythene bag and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** Ⓐ Ⓑ ● Ⓓ
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are however, allowed to carry duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचहत्तर बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए पुस्तिका पर लगी कागज की सील / पोलिथीन बैग को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील / बिना पोलिथीन बैग की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण** : Ⓐ Ⓑ ● Ⓓ जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पुस्तिका के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें । हालांकि आप परीक्षा समाप्ति पर OMR पत्रक की डुप्लीकेट प्रति अपने साथ ले जा सकते हैं ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई अंक काटे नहीं जाएँगे ।**

# MARATHI
# मराठी
## Paper – III
## प्रश्नपत्रिका – III

**Note :** This paper contains **seventy five (75)** objective type questions of **two (2)** marks each. **All** questions are compulsory.

**सूचना** : या प्रश्नपत्रिकेत विविध पर्याय असलेले **75 (पंच्यात्तर)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन गुण** आहेत. **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

**1.** जेयासी परमेश्वर भक्तीची चाड : ते ऐक तू हे कथा अमर गोड

तेया काहीची नाही अवघड : जन्म मरणाचे

अशी कृष्णकथावाचनाची फलश्रुती कोणी सांगितली ?

(A) महदंबा

(B) भास्करभट्ट बोरीकर

(C) नरेंद्र

(D) एकनाथ

**2.** भाषा की हो मऱ्हाठी ।

परि उपनिषदाचीच रहाटी ।।

- असे कोणी म्हटले आहे ?

(A) गोविंदप्रभू

(B) एकनाथ

(C) मुकुंदराज

(D) हेमापंडित

**3.** मानियेला स्वप्नीं गुरुचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ।

यावरी या जाली कवित्वाची स्फूर्ती । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ।।

- ही अभंगरचना कोणाची ?

(A) जनाबाई

(B) बहिणाबाई

(C) तुकाराम

(D) नामदेव

**4.** नसता कवीचा व्यापार । तरी कैंचा असता जगदुद्धार ।

म्हणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ।।

- हे कविकौतुक कोणी केले ?

(A) केशवसुत

(B) तुकाराम

(C) बी

(D) रामदास

**5.** श्रीमंत बाजीराव प्रभुंचे पुण्य आगळें दिसे ।

जीवनीं लवणापरि परस्पर शत्रु विराले तसे ।।

- अशी दुसऱ्या बाजीरावाची स्तुती कोणी केली आहे ?

(A) परशराम

(B) होनाजी

(C) प्रभाकर

(D) रामजोशी

**6.** दळणासारखे किडे रगडले रडती नर नारी ।

लेकराला माय विसरली कसा ईश्वर तारी ।।

- या पंक्ती कोणाच्या ?

(A) सगनभाऊ

(B) अनंतफंदी

(C) अज्ञानदास

(D) परशुराम

7. संपादने आणि कवी यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | चांदणवेल | e. | यशवंत |
| b. | संहिता | f. | मनमोहन |
| c. | पाणपोई | g. | विंदा करंदीकर |
| d. | चिरयौवन | h. | अनिल |
| | | i. | बोरकर |

(A) a – g, b – f, c – i, d – h
(B) a – i, b – g, c – f, d – h
(C) a – h, b – f, c – e, d – g
(D) a – f, b – i, c – e, d – g

8. पुढीलपैकी अवधूत परळकर यांचा लेखसंग्रह कोणता ?

(A) विश्वातील विश्वे
(B) अक्षांश रेखांश
(C) अवाक्षर
(D) माणूसनामा

9. टोपणनावे आणि लेखक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | अंतर्भेदी | e. | नरहर गणेश कमतनूरकर |
| b. | कृष्णद्वैपायन | f. | पुरुषोत्तम मंगेश लाड |
| c. | चकोर | g. | लक्ष्मणराव सरदेसाई |
| d. | वैशाख | h. | त्र्यं.वि. सरदेशमुख |
| | | i. | न.र. फाटक |

(A) a – g, b – f, c – i, d – h
(B) a – i, b – g, c – f, d – h
(C) a – h, b – f, c – e, d – g
(D) a – f, b – i, c – e, d – g

10. पुढील साहित्यकृती कालानुक्रमे लावा :

(A) पोपटपंची, शीळ, एरंडाचे गुऱ्हाळ, विधवाकुमारी
(B) विधवाकुमारी, शीळ, एरंडाचे गुऱ्हाळ, पोपटपंची
(C) विधवाकुमारी, पोपटपंची, शीळ, एरंडाचे गुऱ्हाळ
(D) पोपटपंची, शीळ, विधवाकुमारी, एरंडाचे गुऱ्हाळ

11. गतिशील जीवनमूल्यांचा स्वीकार आणि समाजवादी विचारसरणीचा प्रभाव असणारी वि.वा. हडप यांची कादंबरी कोणती ?

(A) गोदाराणी
(B) वादळ
(C) धरणीकंप
(D) अन्नदाता उपाशी

12. बंडखोर कुमारी, गुंतागुंत, बनावट बायको ही नाटके कोणी लिहिली ?

(A) विश्राम बेडेकर
(B) मा.कृ. शिंदे
(C) गो.के. भट
(D) व्यंकटेश वकील

13. भाषा हे केवळ संप्रेषणाचे किंवा विचार करण्याचे माध्यम नसते. भाषाच विचाराचे स्वरूप पूर्व निश्चित करते, हा माणसाच्या विचाराच्या भाषाधीनतेचा सिद्धान्त कोणी मांडला ?

(A) विल्यम लबव्ह
(B) लेस्ली मिलरॉय
(C) एडवर्ड सपीर
(D) राल्फ फॅसल्ड

**14.** इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज व डच भाषकांच्या व्यापारी वसाहतींमधून निर्माण झालेल्या संकरित वाणींना काय म्हणतात ?

(A) लांग

(B) परोल

(C) पिजिन

(D) भाषेचे प्रमाणीकरण

**15.** स्थिर भाषा, व्याकरण वगैरे गोष्टी या कल्पित आहेत; वेगवेगळ्या वाणी या खऱ्या. प्रत्येक भाषक वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळ्या लोकांशी बोलताना स्वत:ची वाणी त्यांना साजेल अशी करतो. ही भूमिका कोणाची ?

(A) जॉन लिऑन्स (B) रॉबर्ट लापेज

(C) जॉन फिशर (D) नोम चॉम्स्की

**16.** अचपळ, अपरोक्ष, आजन्म, अवजड हे शब्द कोणत्या अर्थप्रक्रियेची उदाहरणे आहेत ?

(A) अर्थभ्रंश (B) अर्थविस्तार

(C) अर्थच्युती (D) अर्थसंकोच

**17.** पुढीलपैकी कोणते तत्त्व स्वनिमनिश्चितीसाठी उपयुक्त नाही ?

(A) पूरक विनियोग

(B) समानार्थकता

(C) वैकल्पिक विनियोग

(D) वैधर्म्ययुक्त विनियोग

**18.** प्रतिभेचे स्वाभाविक कार्य संज्ञेच्या दोन किंवा अधिक रूपांची युती घडविणे हे असते. जीवनव्यवहाराला आवश्यक असणाऱ्या बोधनेच्या प्रक्रियेत हे कार्य बद्ध प्रतिभा करते.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**19.** वैदर्भी, गौडी, पांचाली या तीन रीतींत लाटी या चौथ्या रीतीची भर कोणी घातली ?

(A) भोज (B) राजशेखर

(C) वामन (D) विश्वनाथ

**20.** संस्कृत ग्रंथकारांनी केलेले काव्याचे वर्गीकरण उभे (vertical) आहे, तर पाश्चात्त्यांचे आडवे (horizontal) आहे.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**21.** रस्ते फुलून गेले होते, तिची कळी उमलली होती, गंगायमुना आल्या. - या वाक्प्रयोगांतून कोणता अर्थ व्यक्त होतो ?

(A) वाच्यार्थ (B) लक्ष्यार्थ

(C) व्यंग्यार्थ (D) तात्पर्यार्थ

**22.** शब्द जेव्हा आपला मूळ अर्थ सोडून देतो, तेथे ती जहल्लक्षणा आणि आपला अर्थ न सोडता जेथे दुसरा अर्थ व्यक्त होतो, ती अजहल्लक्षणा

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**23.** साहित्य आणि समाजजीवन हा मार्क्सवादी भूमिकेतून मराठी साहित्याची समीक्षा करणारा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) दि.के. बेडेकर

(B) प्रभाकर पाध्ये

(C) लालजी पेंडसे

(D) पां.वा. गाडगीळ

**24.** समीक्षासंबद्ध सिद्धान्त आणि विचारवंत यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | संज्ञामीमांसा | e. | नोम चॉम्स्की |
| b. | साहित्यगत आदिबंध | f. | नॉर्थ्रोप फ्राय |
| c. | वाचकप्रतिसाद सिद्धान्त | g. | एडमण्ड हुसेर्ल |
| d. | वि-रचनावाद | h. | इ-याक देरिदा |
| | | i. | वोल्फगँग आयझर |

(A) a – g, b – f, c – i, d – h
(B) a – i, b – g, c – f, d – h
(C) a – h, b – f, c – e, d – g
(D) a – f, b – i, c – e, d – g

**25.** शैली म्हणजे केवळ भाषासरणी हे समीकरण आपण टाकून द्यायला पाहिजे, हा विचार कोणी मांडला ?

(A) ब्युफों
(B) रमेश धोंगडे
(C) दिलीप धोंडगे
(D) अशोक केळकर

**26.** सर्जनशील लेखनाचा नाट्य हा सर्वोत्तम आणि सर्वात शाश्वत आविष्कार आहे. – ही भूमिका कोणाची ?

(A) भरत (B) टी.एस. एलियट
(C) अरिस्टॉटल (D) आनन्दवर्धन

**27.** फाइन आर्टस याला प्रतिशब्द म्हणून ललितकला हा शब्द मराठीत पहिल्यांदा कोणी वापरला ?

(A) वा.गो. आपटे
(B) श्री.कृ. कोल्हटकर
(C) वा.म. जोशी
(D) श्री.व्यं. केतकर

**28.** कथा आणि कादंबरी या साहित्यप्रकारांचे वेगळेपण निश्चित करणारे वैशिष्ट्य कोणते ?

(A) लेखनाची लघुता व दीर्घता
(B) जीवनदर्शनाची व्याप्ती
(C) केंद्रवर्ती असणारी गोष्ट
(D) निवेदनपद्धती

**29.** नाट्यविषयक ग्रंथ आणि संबंधित ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | नाट्यविमर्श | e. | गो.के. भट |
| b. | मराठी नाटक आणि रंगभूमी | f. | वसंत शांताराम देसाई |
| c. | विदूषक | g. | के. नारायण काळे |
| d. | नट, नाटक आणि नाटककार | h. | वा.ल. कुळकर्णी |
| | | i. | सुनील सुभेदार |

(A) a – g, b – f, c – i, d – h
(B) a – i, b – g, c – f, d – h
(C) a – g, b – h, c – e, d – f
(D) a – f, b – i, c – e, d – g

**30.** कादंबरी व नाटक या साहित्यप्रकारांतील मूलभूत भेद कोणता ?

(A) जीवनानुभवांची व्याप्ती
(B) कथानकाची रचना
(C) साहित्यप्रकाराच्या आस्वादातील समक्षता
(D) व्यक्तिरेखांची संख्या

**31.** लेखक लिहितो आणि त्या लेखनाला वर्गीकरण/व्यवस्थापन यामुळे विशिष्ट साहित्यप्रकाराचे नामाभिधान प्राप्त होते; साहित्यप्रकारांचे वेगळेपण मनाशी निश्चित करून लेखक लिहीत नसतो याकडे दुर्लक्ष होता कामा नये.

(A) संपूर्ण विधान चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**32.** संस्कृतीची कोणकोणती अंगे साहित्यातून अविभाज्यपणे प्रकटत असतात ?

(A) संस्कारांचा आढळ

(B) तत्त्वविचार, मूल्यव्यवस्था, परंपरा व रीतिरिवाज, समाजस्थिती

(C) समकालीन आर्थिक व राजकीय परिस्थिती

(D) जीवनव्यवहारात घडणारी कालसापेक्ष परिवर्तने

**33.** समर्थ संप्रदायाचे कार्य कोणते ?

(A) आदर्श मूल्यांचा प्रसार

(B) शक्तीच्या उपासनेचा उद्घोष

(C) संघटनातत्त्वाच्या आधारे महाराष्ट्रधर्माची प्रस्थापना

(D) मठ-मंदिरांची उभारणी

**34.** मुलींसाठी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची चळवळ कोणी केली ?

(A) नरसिंह चिंतामण केळकर

(B) धोंडो केशव कर्वे

(C) रमाबाई रानडे

(D) विठ्ठलदास ठाकरसी

**35.** बहुजन समाजाच्या प्रगतीच्या संदर्भात कोणता पवित्रा सर्वात परिणामकारक ठरला ?

(A) शिक्षणप्रसार

(B) नव्या राष्ट्रीय नेतृत्वाची उभारणी

(C) बहुजन समाज घटकांचे एकीकरण

(D) ब्राह्मणी वर्चस्वाचे उच्चाटन

**36.** एकोणिसाव्या शतकातील स्त्रियांच्या दुःस्थितिनिवारणाला पाठिंबा देणारी चित्रणे मराठी कादंबरीतून तर विरोध करणारी चित्रणे पाश्चात्त्य साहित्याच्या अनुकरणाने प्रहसनातून आलेली आढळतात.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**37.** प्रकाशनव्यवहाराद्वारे पुढीलपैकी कोणता परिणाम साधला जात नाही ?

(A) नवनवीन लेखक प्रकाशात येतात.

(B) साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्यातील परस्परसंबंधांच्या अभ्यासास चालना मिळते.

(C) वाचकांच्या वाङ्मयविषयक अभिरुचीला वळण लागते.

(D) विविधस्वरूपाच्या ग्रंथनिर्मितीमुळे ग्रंथालये समृद्ध होतात.

**38.** सृजन, निर्मिती, प्रसारण आणि स्वीकरण या साहित्याच्या चार अवस्थांच्या आधारे अनुक्रमे लेखक, प्रकाशक, समीक्षक व वाचक यांची मिळून एक वाङ्मयीन व्यवस्था कोणी रचली आहे ?

(A) एलेन शोवॉल्टर

(B) प्रीसीला क्लार्क

(C) केट मिलेट

(D) ज्युलिया क्रिस्तेवा

**39.** कादंबऱ्या आणि संबंधित कादंबरीकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | सुवर्णमालिनी | e. | गो.वि. कानिटकर |
| b. | चंपकमाला | f. | जनार्दन सखारामशास्त्री आणि दामोदर बापूजी नाईक |
| c. | मनोरंजक भद्रायु-कीर्तिमालिनी | g. | रामचंद्र आबाजी राजे |
| d. | विलासिनी | h. | लक्ष्मण मोरेश्वर हळबे |
| | | i. | अण्णा मार्तण्ड जोशी आणि विनायक परशराम बाबरे |

(A) a – g, b – f, c – i, d – h
(B) a – i, b – g, c – f, d – h
(C) a – g, b – h, c – e, d – f
(D) a – f, b – i, c – e, d – g

**40.** पुढील विचार कोणाचे ?
जमिनीवर मुलांबाळांसह राबणारा एक, तर तिच्यावरचा लोण्याचा गोळा सबंध गिळून उरलेल्या ताकासाठीदेखील हेवादावा करणारा भांडवलदार शेतकऱ्याच्या छातीवर कायमचा बसलेला असतो

(A) विठ्ठल रामजी शिंदे
(B) जोतीराव फुले
(C) कृष्णराव भालेकर
(D) लोकहितवादी

**41.** अर्थशून्य ब्राह्मणविद्या या लेखामधून अर्थ लक्षात न घेता केवळ पाठांतरावर भर देणाऱ्या ब्राह्मणवर्गावर कोणी टीका केली ?

(A) जोतीराव फुले
(B) लोकहितवादी
(C) गोपाळ गणेश आगरकर
(D) विनायक दामोदर सावरकर

**42.** वैचारिक वाङ्मयाचा गाभा कोणता ?

(A) विचारांची खंडनमंडनपर मांडणी
(B) समर्पक युक्तिवाद
(C) पुरोगामी विचारांचे प्रतिपादन
(D) तर्कशुद्ध सडेतोड मांडणी

**43.** स्वातंत्र्यपूर्व कालातील वैचारिक वाङ्गयाचे सर्वात महत्त्वाचे प्रतिपादन कोणते ?

(A) स्त्रीपुरुष समता
(B) विषमतेचे उच्चाटन आणि नव्या समाजाची निर्मिती
(C) परंपरेचा पुनर्विचार
(D) शिक्षणाचे महत्त्व

**44.** नियतकालिके आणि संबंधित संपादक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | संदर्भ | e. | विद्यासागर महाजन |
| b. | लोकानुकंपा | f. | दिनकर साक्रीकर |
| c. | केल्याने भाषांतर | g. | ग्रेस |
| d. | पूर्वा | h. | योगेन्द्र मेश्राम |
| | | i. | रमेश वरखेडे |

(A) a – g, b – f, c – i, d – h
(B) a – i, b – g, c – f, d – h
(C) a – g, b – h, c – e, d – f
(D) a – f, b – i, c – e, d – g

**45.** अनियतकालिकांच्या चळवळीमागील कारण कोणते ?

(A) नवनवीन लेखकांना लेखनाची संधी उपलब्ध करून देणे
(B) लेखनप्रक्रियेतील प्रमाण भाषेचे वर्चस्व कमी करून बोली भाषेला विशेष वाव देणे
(C) प्रस्थापित वाङ्मयीन नियतकालिकांची मिरासदारी मोडून काढणे
(D) तत्कालीन प्रतिष्ठित नियतकालिकांपासून वंचित राहिलेल्या गुणवत्तापूर्ण लेखनाच्या प्रसिद्धीस अस्मितासंपन्न माध्यम उपलब्ध करून देणे

**46.** पुढील नियतकालिके कालक्रमानुसार लावा :

(A) प्रतिभा, अभिरुची, हंस, नवभारत

(B) अभिरुची, हंस, नवभारत, प्रतिभा

(C) प्रतिभा, नवभारत, अभिरुची, हंस

(D) नवभारत, अभिरुची, हंस, प्रतिभा

**47.** साहित्यसंस्थांच्या वतीने प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांमागे संस्थांचे पाठबळ असूनही स्वतंत्ररीत्या प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांची वाङ्‌मयीन कामगिरी अधिक परिणामकारक ठरली आहे.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**48.** नव्हाळीतले ना उमाळे उसासे
न ती आग अंगात आता उरे
- असे कोणी कोणाला सांगितले आहे ?

(A) मेहरजानने रणमस्तखानाला

(B) सिंधूने सुधाकराला

(C) ऋताने देवव्रताला

(D) पृथ्वीने सूर्याला

**49.** नीतिमूल्यांची गीता असा गौरव कोणत्या साहित्यकृतीचा केला जातो ?

(A) श्यामची आई (B) स्मृतिचित्रे

(C) नटसम्राट (D) बळी

**50.** साहित्यकृतीतील व्यक्तिरेखा आणि संबंधित साहित्यकृती यांच्या जोडया लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | सखारामभाऊजी | e. | कोसला |
| b. | मणिमल्ल | f. | एकच प्याला |
| c. | जगनबुवा | g. | स्मृतिचित्रे |
| d. | रामलाल | h. | पण लक्षात कोण घेतो ? |
| | | i. | वज्राघात |

(A) a – g, b – i, c – e, d – f

(B) a – i, b – g, c – f, d – h

(C) a – g, b – h, c – e, d – f

(D) a – f, b – i, c – e, d – g

**51.** समूह एका अर्थाने लोकगीतांची पुनर्निर्मितीच करीत असतो. - हे विधान कोणाचे ?

(A) कमलाबाई देशपांडे

(B) दुर्गा भागवत

(C) प्रभाकर मांडे

(D) अशोक रानडे

**52.** खेड्याचे शहरीकरण होण्याच्या प्रक्रियेत लोकपरंपरेतील अनेक गोष्टी उपलब्ध होऊ लागल्या असून लोककलावंत यजमानासाठी त्याच्या सोयीनुसार आपल्या कलेचे संक्षेपित रूप सादर करतो.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**53.** लोकसाहित्याच्या अभ्यासाचे संप्रदाय आणि संबंधित अभ्यासक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | भ्रांतसंकल्पनावादी | e. | जेम्स ए फॅरेरे |
| b. | हेतुकथावादी | f. | एरिक फ्रॉम |
| c. | अवशेषवादी | g. | सांप्रिअर आणि बेनियर |
| d. | मानसशास्त्रीय | h. | डनहार्ट |
| | | i. | थिओडोर बेनफे |

(A) a – g, b – i, c – e, d – f

(B) a – i, b – g, c – f, d – h

(C) a – g, b – h, c – e, d – f

(D) a – f, b – i, c – e, d – g

**54.** लोकसाहित्याकडून काही गोष्टींचा अंगीकार केल्याने शिष्ट साहित्य समृद्ध होते, त्याचप्रमाणे शिष्ट साहित्यातील श्रेष्ठ ठरलेल्या, मान्यताप्राप्त, लोकप्रिय झालेल्या अक्षर कलाकृतींचा प्रभाव लोकसाहित्यावरही झालेला असतो.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**55.** पुढील स्त्रीगीतातून कोणता अर्थ सूचित होतो ?

गऊर खेलायाला गेली

गऊर खेलून घरी आली

हाका मारीते सासऱ्याला

हाका मारीते सासूला

उघडा दाराची कुलूपा

मला घरात येऊ द्या

गऊर घरात शिरली

सासूनं धरली, सासऱ्याने मारली

नंदेनं धरली, दिरानं मारली

भावल्यानं धरली, नवऱ्यानं मारली

ओढून टाकली अंगणामधी

गऊर वनवासाला गेली.

(A) ग्रामीण परिसरातील उत्सवाचे वर्णन

(B) खेड्यातील एकत्र कुटुंबपद्धती

(C) सासुरवाशिणीची असहाय्यता

(D) गौराईची कथा

**56.** वसाहतकालात जीवनात आणि साहित्यात पाश्चात्य संस्कृतिजन्य दृष्टिकोण घेतला गेला आणि पाश्चात्य संवेदनशीलता उचलून भारतीय संवेदनशीलता हाकलून लावण्याची धडपड सुरू झाली.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**57.** भारत एक आणि अखंड आहे, भारतीय प्रजा अनेक भाषा बोलत असेल, पण सर्वांचे हृदय एक आहे. – हे विधान कोणाचे ?

(A) जवाहरलाल नेहरू

(B) सरोजिनी नायडू

(C) मौलाना आझाद

(D) शरच्चन्द्र चटोपाध्याय

**58.** तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे काय ?

(A) साधर्म्य, वैधर्म्य, प्रभव आणि प्रभाव या चार अंगांनी साहित्याचा घेतलेला शोध

(B) साहित्याची इतर मानवी आविष्कारक्षेत्रांशी केलेली तुलना

(C) वंश, काळ आणि परिस्थिती यांच्या अनुषंगाने केलेला साहित्याभ्यास

(D) साहित्यनिर्मितीस साह्यभूत होणाऱ्या विविध घटकांचा घेतलेला मागोवा

**59.** अनुसरण हा प्रभावचाच प्रमुख परिपाक असला तरी कधी कधी तद्विरुद्ध प्रक्रिया म्हणजे प्रतिद्वंद्विता हेदेखील त्याचेच एक रूप असते; कठोर चिकित्सा, विरुद्ध दिशेचा केलेला पुरस्कार, तद्व्यावर्तक तत्त्वांधारे केलेली निर्मिती, विडंबन, खंडन या गोष्टींचा समावेश प्रतिद्वंद्वतेत करता येईल.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**60.** ग्रंथ आणि संबंधित ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | कम्पेरेटिव्ह लिटरिचर | e. | एस.एस. प्रावर |
| b. | अ कम्पेरिझन ऑफ लिटरिचर्स | f. | सी.एल. रेन |
| c. | कम्पेरेटिव्ह लिटररी स्टडीज | g. | हेन्री गिफर्ड |
| d. | द आयडिया ऑफ कम्पेरेटिव्ह लिटरिचर | h. | डनहार्ट |
| | | i. | ऑस्कर जे. कॅम्पबेल |

(A) a – g, b – i, c – e, d – f

(B) a – i, b – g, c – f, d – h

(C) a – g, b – h, c – e, d – f

(D) a – f, b – i, c – e, d – g

**61.** स्त्रीवादाची संकल्पना ही कोणत्यातरी एका तत्त्वावर वा एकसत्त्वावर उभारलेली नाही; स्त्रीवादात अनेक तत्त्वे, संकल्पना, दृष्टिकोण व तत्त्वपद्धती यांचा अंतर्भाव झालेला आहे.

(A) संपूर्ण विधान चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**62.** कालानुक्रमे लिहा :

(A) अ रूम ऑफ वन्स ओन, द सेकण्ड सेक्स, सेक्स्च्युअल पॉलिटिक्स, अ लिटरिचर ऑफ देअर ओन
(B) द सेकण्ड सेक्स, सेक्स्च्युअल पॉलिटिक्स, लिटरिचर ऑफ देअर ओन, रूम ऑफ वन्स ओन
(C) रूम ऑफ वन्स ओन, द सेकण्ड सेक्स, लिटरिचर ऑफ देअर ओन, सेक्स्च्युअल पॉलिटिक्स
(D) द सेकण्ड सेक्स, लिटरिचर ऑफ देअर ओन, सेक्स्च्युअल पॉलिटिक्स, लिटरिचर ऑफ वन्स ओन

**63.** स्त्रीवादी साहित्याभ्यासाची व्याप्ती सुचविणारे ग्रंथ आणि संबंधित ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | द फीमेल युनक | e. | सॅण्ड्रा गिल्बर्ट व सुझन गुबर |
| b. | सेक्स्च्युअल/ टेक्स्च्युअल पॉलिटिक्स | f. | एलन शोवॉल्टर |
| c. | द मॅडवुमन इन द ऍटिक | g. | जर्मेनी ग्रिअर |
| d. | टुवर्ड्स अ फेमिनिस्ट पोएटिक्स | h. | केट मिले |
| | | i. | टॉरिल मॉय |

(A) a – g, b – i, c – e, d – f
(B) a – i, b – g, c – f, d – h
(C) a – g, b – h, c – e, d – f
(D) a –f, b – i, c – e, d – g

**64.** 'माझी कहाणी' ही कोणी लिहिली ?

(A) बाया कर्वे
(B) लक्ष्मीबाई पटवर्धन
(C) लीलाबाई पटवर्धन
(D) पार्वतीबाई पटवर्धन

**65.** पुढीलपैकी कोणते नाटक स्त्री नाटककाराचे नाही ?

(A) सौभाग्यकांक्षिणी
(B) ओघळलेले मोती
(C) जुगार
(D) खून पहावा करून

**66.** पुढीलपैकी कोणती साहित्यकृती रा.रं. बोराडे यांची नाही ?

(A) रहाटपाळणा (B) पाझर
(C) सावट (D) राखण

**67.** झाडाझडती या कादंबरीत धरणग्रस्तांचे प्रश्न विस्तारपूर्वक चित्रित झालेले आहेत, तथापि हे सर्व प्रश्न या विषयावरील आधी प्रकाशित झालेल्या सर्व कादंबऱ्यांतही चित्रित झाले होत.

(A) संपूर्ण विधान चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**68.** साहित्यकृती आणि संबंधित साहित्यिक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | मळ्याची माती | e. | व्यंकटेश माडगूळकर |
| b. | वानवळा | f. | व्यंकट पाटील |
| c. | काळी आई | g. | आनंद यादव |
| d. | मंधान | h. | रा.रं. बोराडे |
| | | i. | आनंद पाटील |

(A) a – g, b – i, c – e, d – f
(B) a – i, b – g, c – f, d – h
(C) a – g, b – h, c – e, d – f
(D) a – f, b – i, c – e, d – g

**69.** वारकरी साहित्यसंकल्पनेला जन्म देणारी ग्रामीण कादंबरी असा उल्लेख कोणत्या कादंबरीबाबत केला जातो ?

(A) कार्तिकी

(B) मृण्मयी

(C) पड रे पाण्या

(D) बारी

**70.** 1950च्या दशकात वास्तवाचे यथातथ्य चित्रण करतानाच त्यामधील विरोधाला घटकांच्या विनोदनिर्मितीसाठी उपयोग करून घेणारा ग्रामीण कथाकार कोण ?

(A) द.मा. मिरासदार

(B) शंकर पाटील

(C) श्री.म. माटे

(D) व्यंकटेश माडगूळकर

**71.** वेठबिगारी नाकारणारे, बंडखोर प्रवृत्तीचे, न्यायासाठी लढे उभारणारे, बंधमुक्त समाजाचे स्वप्न पाहाणारे नायक कोणी रंगवले ?

(A) बंधुमाधव

(B) बाबुराव बागूल

(C) भीमराव शिरवाळे

(D) अविनाश डोळस

**72.** इथे जन्मलो नसतो तर बरे झाले असते

शुद्र अतिशुद्र झालो नसतो

अनंत अपमान सहन करावे लागले नसते

व्यथा-वेदनांचे वारूळ माझे मन आणि शरीर झाले नसते

– या पंक्ती कोणाच्या ?

(A) केशव मेश्राम

(B) ज.वि. पवार

(C) बाबुराव बागूल

(D) त्र्यंबक सपकाळे

**73.** पुढील साहित्यकृती कालक्रमानुसार लावा :

(A) जटायू, गावचा टिनोपाल गुरुजी, युगंधर, रत्ना

(B) रत्ना, युगंधर, जटायू, गावचा टिनोपाल गुरुजी

(C) गावचा टिनोपाल गुरुजी, रत्ना, युगंधर, जटायू

(D) जटायू, गावचा टिनोपाल गुरुजी, रत्ना, युगंधर

**74.** नाटक आणि संबंधित नाटककार यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| a. शरण | e. अरुणकुमार इंगळे |
| b. प्रतिबिंब | f. दिलीप ढोणे |
| c. कायर | g. अ.को. सुरडकर |
| d. मीठ | h. रा.का. क्षीरसागर |
| | i. आनंद पाटील |

(A) a – g, b – i, c – e, d – f

(B) a – i, b – g, c – f, d – h

(C) a – g, b – h, c – e, d – f

(D) a – f, b – i, c – e, d – g

**75.** सन्मार्गबोधक निराश्रित समाज नावाची संस्था कुणी स्थापन केली ?

(A) किसन फागू बनसोडे

(B) बंधुमाधव

(C) शिवराम जानबा कांबळे

(D) गणेश आक्काजी गवई

**Space For Rough Work**